MHLA160009962021

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२९५/२०२१</u>**

**<u>शासन वि. गजानंद</u>**

-:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::-

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./३४३/२०२६ तारीख ०७/०३/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक उस्मानाबाद/लातूर यांनी सदर प्रकरण हे महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ कलम ६५-ई च्या गुन्ह्याकरिता दि.१८/११/२०२१ रोजी दाखल झाले. तेव्हापासून सदर प्रकरणामध्ये कोणतीही प्रगती नाही. त्यामुळे आरोपीला वॉरंट बजावणी झालेली नाही. पोलीस अहवाला प्रमाणे आरोपी मिळून येत नसल्याने विनातामील वॉरंट परत केलेला आहे. आरोपीला भविष्यामध्ये सुध्दा सदर वॉरंटची बजावणी होण्याची शक्यता दिसून येत नाही. मुद्देमालामध्ये मद्य असल्याच्या अनुषंगाने रासायनिक परिक्षणाचा अहवाल उपलब्ध आहे. परंतु फक्त अहवालाच्या आधारे अभियोग पक्षाच्या बाजुने सदर प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढता येणार नाही. सबब सदर प्रकरण हे विशेष मोहीमेअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २८१ प्रमाणे बंद करण्यास योग्य आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरण बंद करण्यात येते व आरोपीला दोषमुक्त करण्यात येते.

०३. अपिलाचा कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास जप्त मुद्देमाल नियमाप्रमाणे नष्ट करावा.

०४. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:34:56 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – १३-०३-२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवणी.**